लोकमत

# 'जेडीआयईटी'च्या तीन विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

लोकमत न्यूज नेटवर्क





**यवतमाळ :** येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयात टेक्सटाईल इंजिनिअरिंग शाखेच्या तीन विद्यार्थ्यांना आरएसजे इन्स्पेक्शन सर्विसेस ठाणे या कंपनीने संधी दिली आहे. अभियांत्रिकी पदवीचे अंतिम वर्ष पूर्ण करताच त्यांना जॉब मिळणार आहे.

अतुल कुंभार, मोनिका जीवतोडे व मेकॅनिकल शाखेचा ऋषिकेश मिसाळ यांची निवड झाली आहे. महाविद्यालयात नुकताच कॅम्पस इंटरव्ह्यू घेण्यात आला. त्यात टेक्सटाईल इंजिनिअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेतील पात्र विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांची ॲप्टीट्यूड टेस्ट घेण्यात आली. त्यानंतर टेक्नीकल इंटरव्ह्यू व पर्सनल इंटरव्ह्यूच्या फेऱ्या घेण्यात आल्या. आरएसजे ही थर्ड पार्टी इन्स्पेक्शन इंडस्ट्रीमधील अग्रगण्य कंपनी आहे. जगभरातील ग्राहकांसाठी जसे यूएसए, यूके, जर्मन, फ्रान्स, भारत, हाँगकाँग, चीन, ऑस्ट्रेलिया या देशांमधील गुणवत्ता नियंत्रण तपासणी, लॅब टेस्ट मॅनेजमेंट, फॅक्टरी ऑडिट सेवा प्रदान करते.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना क्वॉलिटी इंजिनिअर या पदावर रुजू करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना कंपनीने दोन लाख ८८ हजारांचे वार्षिक पॅकेज दिले आहे. वीरेंद्र इंगळे यांनी या कॅम्पस इंटरव्ह्यूचे काम पाहिले. महाविद्यालयातर्फे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

Hello Yavatmal
Page No. 4 Jan 06, 2020
Powered by: erelego.com